CIN: L74999MH2016PLC284731
Nirmitee Robotics India Limited
(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

To

BSE Limited

Phiroze Jeejeebhoy Towers,

Dalal Street,

Mumbai - 400001

**Scrip Code:** 543194

**Sub:** Notice published by way of an advertisement in respect of 05th Annual General Meeting (AGM) of the Company.

**Ref:** Regulation 47 read with Regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015

Dear Sir/Ma'am,

Pursuant to regulation 47 read with regulation 30 of SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith the copies of newspaper advertisements published in **"Sakad Today"** Nagpur edition (Marathi) and the **"The Hitavada, City Line"** Nagpur edition (English) on 26th August 2021 informing about 05th AGM of Company and e-voting.

For your information and record.

Kindly acknowledge and oblige.

**Thanking you,**

**Yours faithfully,**

**For Nirmitee Robotics India Limited**

AKHILESH GIRISH MISHRA

Digitally signed by AKHILESH GIRISH MISHRA
Date: 2021.08.26 14:25:03 +05'30'

**Akhilesh Girish Mishra**
Company Secretary cum Compliance Officer
**Membership No:** A65835
**Date:** 26th August 2021
**Place:** Nagpur

## अवतीभवती



नागपूर : अनुराग ठाकूरचा सत्कार करताना समाजसेवक बंडू ठाकरे. बाजूला प्रशिक्षक अण्णा गुरुजी व इतर.

### अनुराग ठाकूर अव्वल

नागपूर, ता. २५ : युजेल स्मित जिमचा सदस्य असलेल्या अनुराग सुधीर ठाकूर याने स्टार क्लासिक स्पर्धेत अव्वल स्थान पटकाविले. या कामगिरीबद्दल काँग्रेसचे समाजसेवक बंडू ठाकरे यांनी अनुरागचा शॉल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाला प्रशिक्षक अण्णा गुरुजी व अन्य मान्यवर उपस्थित होते. अनुरागने यशाचे श्रेय प्रशिक्षक व पालकांना दिले.

### डॉ. गिरीश गांधी यांना पुरस्कार जाहीर



**नागपूर :** ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गिरीश गांधी यांना पहिला सेवादास श्री दलुभाई जैन सूर्योदय समाजसेवा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती मंडळाचे सतीश जैन यांनी दिली. जळगाव व नाशिक येथील सूर्योदय समावेशक मंडळातर्फे डॉ. गिरीश गांधी यांच्या पर्यावरण, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल देण्यात येणार आहे. २१ हजार रुपये आणि गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. महाकवी सुधाकर गायधनी, सावळीराम तिदमे, साहेबराव पाटील, डी. बी. महाजन, प्रवीण लोहार यांच्या निवड समितीने डॉ. गिरीश गांधी यांची या पुरस्कारासाठी निवड केली. जळगाव येथे जानेवारी २०२२ मध्ये होणाऱ्या पहिल्या अ. भा. सूर्योदय मराठी साहित्य संमेलनामध्ये हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येईल.

### परदेश शिष्यवृत्तीसाठी मुदतवाढ

**नागपूर, :** राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांकडून परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात येत असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत १ ऑगस्ट होती. यामध्ये आता शासनाने मुदतवाढ दिली असून अर्ज ३१ पर्यंत सादर करता येणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इ किंवा एचटीपीएस कोलन हॅश एसजेएसए डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इ या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून तो परीपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग संचालनालय, पुणे या पत्त्यावर ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत पोस्टाने किंवा समक्ष सादर सादर करावे, असे आवाहन प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड समाज कल्याण यांनी केले आहे.



# मलवाहिन्या कधी दुरुस्त करणार?

## सिवेज लाइन तुंबल्यास घरात पसरते दुर्गंधी

सकाळ ग्राउंड रिपोर्ट

सकाळ वृत्तसेवा

**दर्शन कॉलनी, ता. २५ : पूर्व नागपूर परिसरातील जुन्या वस्तीमध्ये समावेश असलेल्या दर्शन कॉलनी वस्तीमध्ये गेल्या काही वर्षांपासून मलवाहिनी स्वच्छतेची समस्या गंभीर होत चालली आहे.**

३५ वर्षांपासून असलेली मलवाहिनी जीर्ण झाली असून या प्रकाराने परिसरातील तीन हजारावर नागरिक त्रस्त आहेत. मलवाहिनी तुंबल्यास नागरिकांच्या घरात दुर्गंध पसरते. यावर तोडगा कधी काढणार, असे प्रश्न नागरिक आता विचारू लागले आहेत. दर्शन कॉलनीत ३५ वर्षांपूर्वी नळ, मलवाहिनी आणि सिवेजलाइन टाकण्यात आली. त्यानंतर कच्च्या घरांचे रूपांतर पक्क्या घरांमध्ये झाले. मात्र, यादरम्यान मलवाहिनीच्या दुरुस्तीकडे संपूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना घरात शिरावे लागते.

### बोरवेल, विहिरी दूषित

वस्तीतील मलवाहिनी जीर्ण झाली असल्याने त्यातील पाणी जमिनीत मुरते. ते पाणी ज्या घरी बोरवेल आणि विहिरी आहेत त्यात झिरपते. त्यामुळे बहुतांश विहिरी आणि बोरवेल दूषित झाल्या. हे पाणी वापरल्यास आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

### मलवाहिन्यांवर बांधकाम

वस्तीत ज्या मलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत, त्या दोन घरांच्या रांगेच्या मधोमध आहेत. त्यामुळे घराचे पक्के बांधकाम करीत असताना, अनेक नागरिकांनी मलवाहिन्यावरच बांधकाम केल्याचे दिसते. त्यामुळे मलवाहिनी तुंबल्यास ती स्वच्छ कशी करायची हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. अनेकदा ती स्वच्छ करण्यासाठी काही नागरिक स्वच्छता कर्मचाऱ्यांना शिरूच देत नसल्याचेही दिसून येते.



**दर्शन कॉलनीतील मलवाहिन्यांची समस्या दिवसें दिवस गंभीर होत चालली आहे. ३५ वर्ष जुनी असलेली मलवाहिनी आता जीर्ण झाली असल्याने ती संपूर्णतः नव्याने बाहेरील भागातून नेण्याची आवश्यकता आहे. मात्र, नगरसेवकांचे त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होताना दिसून येते.**

-प्रतीक बावनकर, सामाजिक कार्यकर्ता



**मलवाहिनी तुंबल्याने घरात पाणी शिरते. दुर्गंधी निर्माण झाल्याने घरच्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. पावसाळ्यात त्यातील पाणी घरात येत असल्याने बराच त्रास सहन करावा लागतो.**

-वर्षा धांडे, नागरिक



**अनेकांनी मलवाहिन्यांवर अनधिकृत बांधकाम केले आहे. त्यामुळे त्या स्वच्छ करता येत नाही. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.**

-कुणाल डाखोळे, नागरिक

# कार्यकारी अभियंता हरीश गुप्ता निलंबित

## सुरक्षा ठेव घोटाळा : जिल्हा परिषदेत खळबळ

**नागपूर,ता. २५ :** जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता हरीश गुप्ता यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. लाच प्रकरणात त्यांना लाचलुचपत विभागाने अटक केली होती.

हरीश गुप्ता यांनी जिल्हा परिषदेतील सुरक्षा ठेव घोटाळा उघडकीस आणला होता. त्यानंतर बांधकाम व ग्रामीण पाणी पुरवठा विभागातही हा घोटाळा झाल्याचे समोर आले होते. यात १५ पेक्षा कंत्राटदारांचा समावेश असल्याचे सांगण्यात येते. याप्रकरणी नानक कंस्ट्रक्शन कंपनी विरोधात सदर पोलिस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घोटाळ्यामुळे जिल्हा परिषदेचे वातावरण चांगलेच तापले असून यात कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येते. सीईओ योगेश कुंभेजकर यांनी याच्या चौकशी करता पाच सदस्यीय समिती गठित केली आहे. गुप्ता यांना एका कंत्राटदाराकडून ७५ हजाराची लाच घेण्याप्रकरणी लाचलुचपत विभागाने अटक केली होती. त्यांना दुसऱ्याच दिवशी जामीनही मंजूर झाला होता. सुरक्षा ठेव घोटाळा बाहेर काढल्यानेच त्यांनी गोवण्यात आल्याची चर्चा आहे. दरम्यान आज जलसंधारण विभागाने त्यांच्या निलंबनाचे आदेश काढले.

### संजीव हेमकेंचा प्रभार काढला

संजीव हेमके यांच्याकडून ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाचा प्रभार काढण्यात आला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातील प्रवीण बुराडे यांना कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला. विजय टाकळीकर यांना लाच प्रकरणात अटक झाल्याने हेमके यांच्याकडे कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आला होता. गेल्या वर्षभरापासून त्यांच्याकडे अतिरिक्त प्रभार होता. सुरक्षा ठेव घोटाळा प्रकरणात त्यांच्या कार्यशैलीवर मंत्री सुनील केदार यांनी नाराजी व्यक्त केली होती. प्रशासनही त्यांच्या कामावर समाधानी नसल्याचे सांगण्यात येते. सुरक्षा ठेव घोटाळ्याच्या गांभीर्याची दखल घेत शासनाने कार्यकारी अभियंता पदावर नियुक्ती केल्याची चर्चा आहे.

### अपघातात युवकासह दोघे ठार

**नागपूर,ता. २५ :** दोन वेगवेगळ्या अपघातात १७ वर्षीय युवकासह दोघे जण ठार झाले. पहिल्या अपघातात, विजय गुलाबराव हेटे (५३, गोधनी रेल्वे, जुनी वस्ती) हे आज सोमवारी सकाळी साडेदहा वाजता दुचाकीने घरी जात होते. मानकापूर चौकात भरधाव आलेल्या ट्रॅक्टरने त्यांना जबर धडक दिली. या धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत, आलोक दिपक समुद्रे (१७, सुदर्शननगर) हा चुलत भाऊ प्रिन्स याच्यासोबत शनिवारी रात्री साडेआठ वाजता दुचाकीने जात होते. दानागंज चौकात असलेल्या हरीहर मंदिराजवळ त्यांची दुचाकी घसरली. त्यामुळे झालेल्या अपघातात आलोक हा गंभीर जखमी होऊन ठार झाला.

# मनमानी टॅक्समुळे नागरिक त्रस्त

## अनेकांना आर्थिक फटका, प्रशासनाचे दुर्लक्ष

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २५ : गोरगरीब व मध्यमवर्गीयांची वस्ती असलेल्या त्रिमूर्तीनगरातील बहुसंख्य नागरिक मनपाच्या मनमानी टॅक्समुळे सध्या कमालीचे त्रस्त आहेत. अव्वाच्या सव्वा टॅक्स पाठविण्यात येत असल्यामुळे खायचे की टॅक्स भरायचा, असा संतप्त सवाल येथील नागरिकांनी प्रशासनाला विचारला आहे.

ग्राहक कल्याण समितीचे अध्यक्ष असलेले जागरूक नागरिक डॉ. आशीष अटलोये हे ब्लॅक डायमंड अपार्टमेंट येथील रहिवासी आहेत. आपल्या अडचणी सांगताना ते म्हणाले, मी गेल्या कित्येक वर्षांपासून जास्तीचा टॅक्स भरत होतो. टॅक्स कमी करण्याविषयी तक्रार अर्ज केल्यानंतर मोजमाप झाले. त्यानंतर अचानक टॅक्स कमी करण्यात आला. मात्र तोपर्यंत आठ ते दहा वर्षे आम्ही अधिक टॅक्स भरून झाले. या काळात आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले. त्याची भरपाई कोण करणार. अर्ज केल्यानंतरच टॅक्स कमी होणार काय? अनेक नागरिकांची ही समस्या आहे. वाढीव टॅक्ससंदर्भात मनपाने स्वतः पुढाकार घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

### चार दिवसांपासून गडर लाईन चोक

एकात्मतानगर येथील रहिवासी असलेले अरुण उगले कुली व साफसफाईचे काम करतात. गेल्या तीन-चार दिवसांपासून त्यांच्या घराजवळील गडर लाईन चोक झाली आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. तक्रार करून तीन दिवस झाले, सतत येरझारा मारत आहेत. कुणाला तरी पाठवतो असे सांगून त्यांची बोळवण करण्यात आली. परंतु अजूनही समस्येचे निराकरण करण्यात आले नसल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय वीज बिल भरमसाठ येत असल्याची त्यांची तक्रार आहे. त्यांच्या घरात चार सदस्य आहेत. विजेचे बिल तीन हजार रुपये आहे. कमाई जेमतेम आहे. अशा स्थितीत वीज बिल भरायचे की, पोटपाणी, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. मनमानी टॅक्स व नळाच्या भरमसाठ बिलाबद्दलही त्यांची तक्रार आहे.

### त्रिमूर्तीनगरातील सिग्नल भगवानभरोसे

त्रिमूर्तीनगर चौक हा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. या मार्गावर दिवसभर वाहनांची प्रचंड गर्दी असते. मात्र त्यानंतरही हा चौक भगवानभरोसे आहे. या चौकात एकही वाहतूक पोलिस तैनात राहात नाही. त्यामुळे ट्रॅफिक जॅमची मोठी समस्या जाणवत आहे. अशावेळी अपघात होऊन एखाद्याचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. गैरसोय टाळण्यासाठी येथे नियमित वाहतूक पोलिसाची गरज असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.



### नागरिकांना आवाहन

उपराजधानीतील असंख्य नागरिकांना मनपाकडून जास्तीचा टॅक्स पाठविण्यात येतो. मात्र बहुतेक जण टॅक्स भरून मोकळे होतात. त्यासंदर्भात कसलीही तक्रार करीत नाहीत. ज्यांना टॅक्स अधिक आला असे वाटत असेल, त्यांनी कर आकारणी विभागात रीतसर अर्ज करून वाढीव टॅक्स कमी करवून घ्यावा, असे आवाहन डॉ. आशीष अटलोये यांनी यावेळी केले.

### ट्रकमधील १३ लाखांची औषधे गायब

**नागपूर,ता. २५ :** बैद्यनाथ कंपनीने ट्रकमधून पुणे शहरात पाठविलेल्या औषधांपैकी १२.९२ लाखांची औषधे रस्त्यातच गायब झाली. या प्रकरणी पोलिसांनी बैद्यनाथ आयुर्वेद प्रा.लि. कंपनीचे व्यवस्थापक संजय दत्तात्रय अग्निहोत्री (५२) यांच्या तक्रारीवरून मेसर्स शीतल कॅरिंग कार्पोरेशनचे मालक संजय अग्रवाल, प्रतीर रोड लाईन कंपनीचे मालक ज्योती बाबुसाहेब जाधव आणि ट्रक चालक ज्ञानेश्वर बाबुराव कापसे (३०) विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. बैद्यनाथ कंपनीला पुण्यातील एका कंपनीकडून औषधांची मोठी ऑर्डर मिळाली होती. त्या ऑर्डरनुसार त्यांनी ३ ऑगस्टला दुपारी आपल्या गोदामातून औषधांचे ११४३ बॉक्स (एमएच-१२/क्यूडब्ल्यू-१५५१) क्रमांकाच्या ट्रकमधून पुण्याला रवाना केले. ६ ऑगस्टला संबंधित कंपनीमध्ये तो माल पोहोचला. माल तपासला असता ४ बॉक्स कमी असल्याचे आढळले. या चार बॉक्समध्ये एकूण १२ लाख ९२ हजारांची औषधे कमी होती.

### मुलाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

**नागपूर, ता. २५ :** कपीलनगर ठाण्याच्या हद्दीतील समतानगर इटाभट्टीजवळ हनुमान मंदिराशेजारी गुरुवारी सायंकाळी १२ ते १३ वर्षे वयोगटातील मुलाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. याच घटनास्थळापासून जवळच असलेल्या समतानगर, राजनंदीनी ले-आउट येथील पाण्याच्या डबक्यातील पाण्यावर शुक्रवारी सकाळी आदित्य शरणागत (१०) याचा मृतदेह तरंगताना आढळून आला.

# अखेर चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती

सकाळ IMPACT

## अधिकाऱ्यांच्या गोंधळाने मृत व्यक्तीस प्रमोशन!

**काजल गणवीर :** सकाळ वृत्तसेवा

नागपूर,ता.२५: मागील ११ वर्षापासून चतुर्थ श्रेणी आरोग्य कर्मचाऱ्यांची पदोन्नती रखडलेली होती. यासंदर्भातील वृत्त 'सकाळ'ने प्रकाशित केल्यानंतर जागे झालेल्या प्रशासनाने २० कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली. मात्र, पदोन्नती देताना अधिकाऱ्यांनी चक्क मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यालाही पदोन्नतीचा लाभ देत नवा गोंधळ उभा केला आहे. असे असले तरी १५० पैकी केवळ २० जणांनाच न्याय मिळाला असला तरी बाकीच्या १३० कर्मचाऱ्यांचे काय, हा प्रश्न मात्र, कायम आहे. 'सकाळ'ने उचलून धरलेल्या या प्रकरणास आंशिक न्याय मिळाला आहे. उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयाने जवळपास २० कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश दिले आहेत. 'पदोन्नती होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांचे षड्यंत्र' या मथळ्याखाली १९ ऑगस्टला 'सकाळ'ने वृत्त प्रकाशित केले होते. जवळपास दीडशे पेक्षा जास्त कर्मचारी नियमित पदोन्नतीपासून मागील ११ वर्षापासून वंचित असल्याचे वृत्त देण्यात आले होते. त्या वृत्तावरून महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसोबत मिळून निदर्शने केली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी २० जणांच्या पदोन्नतीचे आदेश दिले आहेत.

### अधिकाऱ्यांचा गोंधळ चव्हाट्यावर

अधिकाऱ्यांनी पदोन्नतीचे आदेश दिले मात्र, त्यापैकी एका कर्मचाऱ्याचा २१ नोव्हेंबर २०२० लाच मृत्यू झाला आहे. एवढेच नाही तर मृत कर्मचाऱ्याच्या पत्नीला अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती सुद्धा देण्यात आली आहे. या दोन्ही प्रकरणाचे स्पष्टीकरण घेण्यासाठी उपविभागीय आरोग्य सेवा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता तो त्यांनी प्रतिसाद दिला नाही. नव्याने उभ्या झालेल्या या प्रकरणामुळे आता जबाबदार अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.



पदोन्नती होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांचे षडयंत्र

आरोग्य उपसंचालक कार्यालयातील प्रकार : शेकडो चतुर्थ श्रेणी कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित

**जवळपास २० जणांच्या पदोन्नतीचे आदेश उपविभागीय कार्यालयाने दिले आहेत. चतुर्थ कर्मचाऱ्यांचा हा केवळ आंशिक विजय आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश अधिकाऱ्यांनी तत्काळ काढावे. अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल.**

**-राजकुमार रामटेके, कार्याध्यक्ष,** आरोग्य विभाग, म. रा. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ.

CIN : L74999MH2016PLC284731
**NIRMITEE ROBOTICS INDIA LIMITED**
(Formerly Known as Nirmitee Robotics India Private Limited)
H.O.:D3/2, MIDC Hingna, Nagpur. (MS) India 440028
Phone:+91-9422 881 677, Email:info@nirmiteerobotics.com
www.nirmiteerobotics.com

Nirmitee©
Innovation. Experience. Excellence

**वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-मतदार माहितीची सूचना**

भागधारकांना याव्दारे कळविण्यत येते आहे की **निर्मिती रोबोटिक्स इंडिया लिमिटेडच्या** सदस्यांची **पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा (ए.जी.एम.) 25 सप्टेंबर 2021 रोजी शनिवार दुपारी 03.00 वाजता** कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात **केयर ऑफ मनिषा सेल्स, डी 3/2, हिंगणा एम. आय. डी. सी., नागपूर, महाराष्ट्र 440028, भारत.** येथे ए.जी.एम. च्या नोटीसमध्ये नमुद केल्याप्रमाणे व्यवसाय व्यवहार करण्या साठी आयोजित केली आहे त्याची नोटीस भागधारकांना पाठविली जाईल.

कंपनी कायदा 2013 मधील 108 च्या तरतुदींनुसार आणि व्यवस्थापन आणि प्रशासन कायदा 2014 च्या (सुधारित) नियम 20 चा उल्लेख करून तसेच, सेबीच्या (बंधन आणि प्रकटीकरण आवश्यकतांची यादी) नियम 44 अनुसार कायदा 2015(सुधारित) कंपनी आपल्या सर्व आदरणिय सदस्यांना बैठकीत व्यवहार करण्याच्या वस्तुंवर त्यांचे मौल्यवान मत देऊ शकेल यासाठी ई-मतदान सुविधा देत आहे.

नोटीस आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेत स्थळावर **https://www.nirmiteerobotics.com/investors /** आणि स्टॉक एक्सचेंज च्या **https://www.startupsbse.com/index.html** येथे उपलब्ध असेल..

**ई-मेल पत्ता नोंदणी अद्यानवित करण्याची पध्दत:**

भागधारक ज्यांचे शेअर्स डिमटेरियलाइझ मोड मध्ये आहेत आणि त्यांचे डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट सह त्याचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत अद्यावतकेले नाहीत त्यांनी संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपेन्ट सांबत त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत अद्यानवित करण्याची विनंती करण्यात येतआहे.

**ई मतदानाव्दारे मतदानाचा हक्क :**

ए. जी. एम. च्या नोटीसमध्ये नमुद केल्यानुसार कंपनी आपल्या सर्व भागधारकांना दुरध्वनी ई मतदान सुविधा देत आहे. आणि ए. जी. एम दरम्यान मतपत्रिका सुविधा देखील उपलब्ध असेल. ई-मतदान करण्यासाठी लॉगिन तपशील भागधारकांना ई मेलच्या माध्यमातून मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल

ई मतदान सुलभ करण्यासाठी कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एन.एस.डी.एल) च्या सेवांचा लाभ घेतला आहे. रिमोट ई - मतदानाची सविस्तर प्रक्रिया ए. जी. एम च्या नोटिसात प्रदानकेली आहे. व त्याचे तपशील हे कंपनीच्या संकेतस्थळ **https://www.nirmiteerobotic.com/investors /** वर आणि एम. एस. डी. एल. च्यावेबसाईटवर **www.evoting.nsdl.com** देखील उपलब्ध असतील.

कंपनीची सदस्य नोंदणी आणि समभाग वितरणाची नोंदणी दिनांक **मंगळवार 21 सप्टेंबर 2021 ते शनिवार 25 सप्टेंबर 2021** (या दोन्ही दिवसांसह) कंपनीच्या पाचव्या आमसभेसाठी बंद ठेवण्यात आले आहे. 20 सप्टेंबर 2021 हा दिवस ई मतदान करिता पात्र उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक :**

**निर्मीती रोबोटीक्स इंडिया लिमीटेड**
**जय प्रकाश मोटघरे**
**संपुर्ण वेळ संचालक**
**DIN :- 07559929**

# भीमराज यांच्या अवयवदानातून जीवदान

## नेत्रदान करून पेरला दोघांच्या जीवनात प्रकाश

सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. २५ : अपघातात मेंदूला जबर दुखापत झाल्याने अनंताच्या प्रवासाला निघालेले भीमराज रामदास गजभिये यांच्या कुटुंबीयांनी काळजावर दगड ठेवत केलेल्या अवयवदानामुळे तिघांना जीवदान मिळाले. न्यू इरा रुग्णालयात एका ४५ वर्षीय व्यक्तीला यकृत तर किंग्जवे आणि ऑरेंज सिटी रुग्णालयात दोघांना किडनी दानातून जीवनदान मिळाले. नेत्रदानातून दोघांना नव्याने नजर मिळाली. दुःखात असतानाही त्यांची पत्नी कुसुम आणि मुलगी स्नेहल यांनी समाजासमोर अवयवदानाचा आदर्श घालून दिला.



भीमराज गजभिये

भीमराज गजभिये मूळचे चंद्रपूर जिल्ह्यात नगिनाबागेतील. ६२ वर्षीय भीमराज वेकोलीतून निवृत्त झाले. २०ऑगस्ट रोजी घरीच बाथरूममध्ये पडले. त्यांच्या डोक्याला जबर इजा झाली. त्यांना तत्काळ किंग्जवे हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले. उपचाराला दाद मिळत नसल्याने त्यांच्या जगण्याची आशा मावळली. मेंदूमृत समितीकडून त्यांची तपासणी करण्यात आली. ब्रेनडेड घोषित केल्यानंतर विभागीय अवयवदान समितीच्या अध्यक्ष डॉ. विभावरी दाणी, सचिव डॉ.संजय कोलते यांना सूचना देण्यात आली. त्यांनी स्थानिक अवयवदानाची प्रतीक्षा यादी तपासली असता, न्यू इरा रुग्णालयात यकृताच्या प्रतीक्षेत ४५ वर्षीय युवक असल्याचे समजले. तत्काळ संपर्क साधून त्यांना यकृत दान करण्याचा निर्णय घेण्यात आला. तर किंग्जवे हॉस्पिटलमध्ये ५९ वर्षीय व्यक्तीला किडनी दानातून जीवनदान मिळाले. डॉ. डॉ. प्रकाश खेतान, डॉ. विशाल रामटेके, डॉ. वासुदेवराव रिधोरकर, डॉ. शीतल आव्हाड, डॉ. चंद्रशेखर चाम, डॉ. राजन बारोकर, डॉ. विरेंद्र बेलेकर, डॉ. अफलज शेख यांनी प्रत्यारोपण केले. तर ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये डॉ. एस. जे. आचार्य, डॉ.सुहास साल्फेकर, डॉ. अमित देशपांडे, डॉ. स्मिता हरकरे, डॉ. अनिता पांडे यांनी किडनी प्रत्यारोपरणातून ४८ वर्षीय महिलेला जीवनदान दिले. न्यू इरामध्ये यकृत प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. राहुल सक्सेना, डॉ. स्नेहा खाडे यांच्या पथकाने यकृत प्रत्यारोपण करीत ४५वर्षीय युवकाला जीवनदान दिले.

### मध्य भारतात सर्वाधिक प्रत्यारोपण न्यू इरात

नागपुरात अयवदानाबाबत बरीच जागृती होत आहे. आतापर्यंत यकृत प्रत्यारोपणातून ६० पेक्षा अधिक जणांचा जीव वाचवण्यात आला. यापैकी ४३ यकृत प्रत्यारोपणाच्या यशस्वी शस्त्रक्रिया न्यू इरा हॉस्पिटलमध्ये झाल्या आहेत. मध्यभारतामध्ये सर्वाधिक यकृत प्रत्यारोपण झाले असून अवयवदानाच्या कार्याला नातेवाईकांची मोलाची साथ लाभत आहे, असे प्रसिद्ध हृदयप्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ.आनंद संचेती यांनी सांगितले.

